# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू पाच हजारांना जेवू घालतो




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen



60 गोष्टींतील 51 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

पुष्कळ धर्मपुढारी लोक (ज्यांना परुशी असे म्हणत) येशू विषयी खोट्या गोष्टी सांगत असत. काहींनी तर त्याला मारण्याचा देखिल प्रयत्न केला.



1

तो खरोखर देवाचा पुत्र आहे यावर त्यांचा विश्वास नव्हता. तो देवाचा पुत्र आहे हे सिध्द् करणारे चमत्कार त्याने केले तरी देखिल त्यांनी त्याचा स्विकार केला नाही.



2

एके दिवशी, येशू गालील समुद्राच्या पलिकडे गेला. खरेतर, त्याच्या अवतीभोवती असणाऱ्या गर्दी पासून त्याला काही वेळा एकांत हवा होता.




परंतू लोकांनी लवकरच तो कुठे आहे याचा शोध केला. येशूने महान चमत्कार केले आहेत हे त्यांना माहित होते. त्यांना येशू संगती राहावेसे वाटत होते.




येशू डोंगरावर जाऊन आपल्या शिष्यांसह तेथे बसून शिकवू लागला. अधिकाधिक लोक येत राहिले. लवकरच संध्याकाळच्या जेवणाची वेळ झाली. सगळ्यांना भूक लागली असणार.




येशूने लोकसमुदायाकडे पाहिले. व फिलिप्पाला विचारले, "ह्यांना खावयाला आपण भाकरी कोठून विकत आणाव्या?" जवळपास विकत घेण्यासाठी दुकाने देखिल नव्हती. येशूची काय करण्याची योजना होती?




फिलिप्पाने त्याला उत्तर दिले, "काहीतरी नवल विशेष घडले तरच या लोकसमुदायाला आपण जेवण देऊ शकू." येशू आणि त्याच्या शिष्याजवळ पुरेसे पैसे नव्हते.




अंद्रिया (शिमोन पेत्राचा भाऊ) नावाचा दुसरा एक शिष्य येशूला म्हणाला, "येथे एक लहान मुलगा आहे, त्याच्याजवळ जवाच्या पाच भाकरी व दोन मासळ्या आहेत..."



"... परंतु त्या इतक्यांना कशा पुरणार?" जरी त्या लहान मुलाने त्याचा जेवणाचा डब्बा येशूला दिला तरी ऐवढेसे अन्न ऐवढ्या मोठ्या लोकसमुदायाला कसे पुरणार हे अंद्रियाने पाहिले नव्हते.



9

येशूने म्हटले, "लोकांना बसवा." मग तेथे जे सुमारे पाच हजार पुरुष होते ते बसले. व्वाव ! पाच हजार ! यांत तेथे उपस्थित असलेल्या स्त्रीया आणि लेकरे यांची मोजणी करण्यात आली नाही.



10

त्यानंतर येशूने, त्या भाकरी व मासळ्या घेतल्या. त्या लहान मुलाने येशूवर विश्वास केला असावा. येशूला त्याचे जेवण का हवे आहे किंवा हे जेवण घेऊन येशू काय करणार आहे याची त्याला काहि कल्पना नसावी.



11

त्याला कदाचित असे वाटले असावे, "जर मी माझे जेवण येशूला देऊन देईन, तर माझ्याकडे खाण्यासाठी काही नसणार." परंतू तरी देखिल त्याने ते येशूला देऊन दिले.



12

त्यानंतर, येशूने प्रार्थना केली. त्याने देवाचे आभार मानले. पाच भाकरी आणि दोन मासळ्या? होय ! येशूने देवपित्याला, "आभार मानतो" असे म्हणून ते अन्न आशिर्वादित करण्याची प्रार्थना केली.



13

प्रार्थना झाल्यावर, येशूने त्या भाकरी मोडल्या आणि त्या भाकरी व मासे शिष्याना दिले, त्यांनी त्या मोठ्या जमावात ते वाटून दिले. येशूने केलेला हा चमत्कार तेथील लोकांनी अनुभवला. प्रत्येक व्यक्ति भरपूर जेवला आणि तरी देखिल ते जेवण संपले नाही.



14

सर्व जण तृप्त झाल्यावर देखिल, तेथे पुष्कळ मासळ्या आणि भाकरी उरलेल्या होत्या. येशूने शिष्यांना सांगितले की, "काही वाया जाऊ नये म्हणून उरलेले तुकडे गोळा करा." तेंव्हा त्यांनी खाऊन उरलेले तुकडे गोळा केले आणि ते बारा टोपल्या भरले.



15

एका लहान मुलाकडे असलेल्या जेवणाने, त्या दिवशी, येशूने पाच हजार पेक्षा अधिक लोकांना जेवू घातले. दुसऱ्या वेळेस त्याने ४,००० पेक्षा अधिक लोकांना सात भाकरी व काही मासे यांनी जेवू घातले.



16

जेंव्हा सर्वसामान्य लोकांनी हे पाहिले, तेंव्हा त्यांना परुशी लोकांप्रमाणे राग आला नाही.



17

त्याऐवजी, "जगात जो संदेष्टा येणार आहे तो खरोखर हाच आहे." असे ते म्हणाले. देवाच्या पवित्र वचनात ज्या तारणाऱ्याविषयी अभिवचने दिली आहेत तो येशू हाच आहे हे लोकांना माहित होते.



18

येशू पाच हजारांना जेवू घालतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!